महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम

शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६

(सकाळी ०९-३० ते १०-४५ वाजेपर्यंत)

(गुरुवार, दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित, धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी, अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील,

श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)

"मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी ‘जेम’ पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी ‘मुंबई क्लीन लीग’ स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन ‘वेस्ट टु एनर्जी’ तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुर्नविकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी

'दत्तक वस्ती योजना' अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे, साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता, कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(सकाळी ११-०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे

(अ) तारांकित प्रश्न

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३७ ते ४३ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचे सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(छ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ज) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(झ) हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ ते सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(त्र) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ट) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ठ) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ड) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ढ) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ण) एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(त) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(थ) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)

चार : शासकीय विधेयक :

पुर:स्थापनार्थ :-

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र चिकित्सा आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(१) **श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहर व खडकवासला मतदार क्षेत्रातील धनकवडी, धायरी, वडगाव बु.हायवे, नऱ्हे, आंबेगाव, कोल्हेवाडी, नवले पूल, कात्रज, वारजे, बावधन, कोथरूड व सिंहगड रस्ता भागात वारंवार दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित होणे, धनकवडी-सहकारनगर तसेच तळजाई पठार सर्वे क्र.८ येथील ३० वर्षे जुन्या २२ के.व्ही. उच्चदाब वाहिन्या जीर्ण, कमी वहनक्षम, अनेक जॉइंटयुक्त व भूमिगत नसल्याने मानवी जीवित, वन्यजीव व सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होणे, बावधन उपकेंद्र प्रलंबित असणे, नऱ्हे, आंबेगाव, नवले पूल भागात मागील पाच वर्षांत १ मेगावॅटपेक्षा अधिक वीजभार मंजूर करूनही आवश्यक Sub Station अथवा Switching Station उभारण्यात न येणे, नवीन बांधकामांना वीज नियामक आयोगाच्या अटींचे पालन न करता विद्युत जोडण्या दिल्याच्या तक्रारी, धोकादायक उघड्यावरील डी.पी., स्मार्ट मीटर बिलांतील तफावत, महावितरणकडून देखभाल, लोकप्रतिनिधींशी समन्वय व तक्रार निवारणाकडे दुर्लक्ष, वीज ग्राहकांना हीन वागणूक, उच्च वीजभार मंजुरीपूर्वी आवश्यक Sub Station अथवा Switching Station उभारणी बंधनकारक करण्याचे धोरण निश्चित करणे, उच्च वीजभार मंजुरींची नकाशे सह कागदपत्रे यांची त्रयस्थ छाननी, नवीन उपकेंद्रे, उघड्यावरील धोकादायक २२ के.व्ही. वाहिन्यांचे भूमिगतीकरण, डी.पी. सुरक्षितीकरण, घरगुती ग्राहकांप्रमाणेच औद्योगिक, व्यावसायिक व कारखाना यांनाही स्मार्ट मीटर प्रणाली

बंधनकारक करणे व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. अजय चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात "फ" दक्षिण विभागामध्ये परळ येथील मालमत्ता विभागाच्या मालकीच्या प्लॉट नं.१३९/१३० वर असलेल्या पवनपुत्र गृहनिर्माण सोसायटीचा पुनर्विकास प्रकल्प मे.जी.आर.एस.शेल्टर्स या विकासकाने बांधला असून विकासकाने प्रकल्पाच्या सुरुवातीस बांधकाम आराखड्यास रहिवाश्यांची मान्यता घेणे, तद्नंतर सदर बांधकाम आराखड्यात रहिवाशांना विश्वासात न घेता वारंवार केलेले फेरबदल, सदर सुधारीत आराखड्यात रहिवाशांना यापूर्वी मंजूर केलेल्या सुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, विकासकाने बांधकाम करतांना केलेली अनियमितता, महानगरपालिकेचा मालमत्ताकर थकीत ठेवणे, मालमत्ता कर थकीत असतांनाही महानगरपालिकेने सदर विकासकाला विक्री घटकाच्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देणे, सदर भूखंडावर विकासकाकडून बेकायदेशीर हॉटेल सुरु करण्यात येणे, तसेच विकासकाकडून मूळ रहिवाश्यांना अद्यापही ताबा पत्र देण्यात न येणे, शासनाने या सर्व प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषी विकासकावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुनिल कांबळे, मनोज जामसुतकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरातील सी.टी.एस. क्रमांक ६६०, कोथरूड (गोसावी वस्ती) येथील झोपडपट्टी पुनर्वसन (SRA) प्रकल्पामध्ये अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास येणे, उपलब्ध कागदपत्रांनुसार सदर ठिकाणी एकूण ३७ मूळ झोपडीधारक असणे, यासंदर्भात संबंधित झोपडीधारकांनी दिनांक १८ फेब्रुवारी, १९९८ रोजी विभागीय आयुक्त,पुणे (भूसंपादन विभाग) यांच्याकडे अर्ज सादर करणे, तसेच सदर अर्जाच्या प्रती तत्कालीन मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांनाही पाठविण्यात आल्या असणे, सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या विकासकाने मूळ ३७ झोपडीधारकांच्या जागी एकूण १६० झोपडीधारकांची यादी तयार करून त्यामध्ये १२३ कथित बनावट झोपडीधारकांचा समावेश केल्याचा आरोप होणे, तसेच या कथित बनावट लाभार्थ्यांच्या नावावर बनावट वीज बिले, रेशनकार्ड व इतर कागदपत्रे तयार करून त्यांना प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आल्याचा तसेच त्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचाही आरोप होत असणे, या कथित बनावट लाभार्थ्यांच्या आधारे शासनाकडून अतिरिक्त विकास हक्क हस्तांतरण (TDR), वाढीव फ्री-सेल क्षेत्र व इतर विकास लाभ मिळविण्यात आल्यामुळे शासनाची सुमारे १०० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली असणे, या संपूर्ण प्रकारामुळे मूळ पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाच्या हक्कांवर गदा आली असून शासनाच्या महसूलाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त

करण्यात येत असणे, सदर प्रकरणातील सर्व आरोपांची सखोल, निष्पक्ष व कालबद्ध चौकशी करून प्रकल्पातील सर्व झोपडीधारकांची पात्रता, सादर करण्यात आलेली कागदपत्रे, मंजूर करण्यात आलेला अतिरिक्त TDR, फ्री-सेल क्षेत्र, संबंधित विकासक तसेच संबंधित शासकीय अधिकारी यांच्या भूमिकेची सर्वंकष चौकशी करण्याची आवश्यकता, दोषींविरुद्ध फौजदारी व प्रशासकीय कारवाई करून मूळ पात्र झोपडीधारकांना न्याय मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"शेवगांव (जि. अहिल्यानगर) तालुक्यातील जायकवाडी धरण प्रकल्पग्रस्तांना अद्याप भूसंपादनाचे मोबदले, पर्यायी जमीन, पुनर्वसित गावांना सुविधा मिळाल्या नसणे, जायकवाडी धरणाच्या निर्मितीसाठी सन १९६६ मध्ये भूसंपादन प्रक्रिया सुरु झालेली असणे, अद्यापपर्यंत भूसंपादन झालेल्या प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे पूर्ण मोबदले किंवा पर्यायी जमीन देण्याचे प्रस्ताव प्रलंबित असणे, सन १९६६ साली पर्यायी जमीन देतांना ६५ टक्के रक्कम अनामत भरण्याचा कायदा अस्तित्वात नसणे, सन १९७६ च्या भूसंपादन कायद्यानुसार व परिपत्रकाच्या अटी तसेच मा. न्यायालयाचे निर्णयानुसार मोबदले व जमीन देण्याचे प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे, ज्यांना पर्यायी जमीन मंजूर केल्या त्यांना विविध कारणांमुळे जमिनीचा ताबा न मिळणे, त्याऐवजी जमीन बदल करुन मिळण्याचे प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्त व त्यांचे वारसदारांचे आर्थिक परिस्थिती प्रचंड हालाखीची होत असणे, यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना, धरणग्रस्त संघटनेमार्फत शासनाकडे व मा. न्यायालयात न्यायासाठी पाठपुरावा करण्यात येणे, तसेच या प्रकल्पग्रस्तांना न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(५) श्री.अमोल जावळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील आदिवासीबहुल चारमळी गावासाठी आदिवासी विकास विभाग, मा. पालकमंत्री व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत विविध विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला असणे, निधी मंजूर होऊनही संबंधित कामांना अद्याप प्रत्यक्ष सुरुवात झालेली नसणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व असंतोष निर्माण होणे, मंजूर कामांच्या अंमलबजावणीतील विलंबामुळे गावाच्या विकासावर परिणाम होत असणे, प्रशासकीय मंजुरी, कार्यवाही व इतर प्रक्रियांतील दिरंगाईमुळे विकासकामे रखडलेली असणे, चारमळी हे दुर्गम व आदिवासीबहुल गाव असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांना विविध मुलभूत सुविधांच्या अडचणींना सामोरे जावे लागत असणे, विशेषतः शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, मंजूर निधी असूनही प्रत्यक्ष कामे सुरू न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये शासन व प्रशासनाबाबत असंतोष निर्माण

होणे, परिणामी विकासकामांतील विलंबाची चौकशी करून मंजूर कामे तातडीने सुरू करणे तसेच त्यांची सद्य:स्थिती, कालमर्यादा व प्रलंबित बाबींची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

सहा : (गुरुवार, दिनांक ०२ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री सुनिल प्रभू, रोहित पवार, अमिन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षीरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहूल पाटील, श्री. रोहित पाटील डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनील राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्राविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यातील विद्यमान सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर पूर्णपणे अपयशी ठरले असून विकासाचे दावे केले जात असताना प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांना रोजच्या जीवनात गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे, राज्यात महावितरणचा कारभार पूर्णपणे कोलमडला असून ग्रामीण भागात कोणतीही पूर्वकल्पना न देता ८ ते १० तास अघोषित लोडशेडिंग केली जाणे, वाढीव आणि चुकीची वीज बिले देऊन सर्वसामान्यांची लूट सुरू असणे, ट्रान्सफॉर्मर (डीपी) जळाल्यास तो बदलून मिळण्यासाठी शेतकऱ्यांना महिनाभर ताटकळत राहावे लागणे, पूर्वसूचनेशिवाय आणि विश्वासात न घेता 'स्मार्ट मीटर' सक्तीने लावण्यात येणे, या स्मार्ट मीटरमुळे वीज बिल दुप्पट-तिप्पट येत असून, रिचार्ज संपताच वीज खंडित होत असणे, नियोजनाचा अभाव असलेल्या शहरीकरणामुळे महानगरे आणि नगरपालिका क्षेत्रांचे रूपांतर कचराकुंडीत झाले असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये करोडो रुपयांचा होत असलेला गैरव्यवहार, बोरीवली नगर भूमापन ६४२ च्या ठिकाणी नगर भूमापन अधिकारी यांना हाताशी धरुन चुकीचा नकाशा तयार करणे आणि एफएसआय वाढवून विकासकास २०० कोटी रुपयांचा फायदा करुन देणे, दिडोंशी येथील पद्मावती नगर येथे सन २०१२ पासून विकासकाने पुनर्वसन न करता ८० घरमालकांना बेघर करणे, मिरा-भाईंदरमधील लोकप्रतिनिधींनी अधिकारांचा दुरुपयोग करुन अनधिकृत बांधकाम करणे, मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये टीडीआर नियमावलीत बेकायदेशीर बदल करून ठराविक बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा देण्यात येणे, धारावी पुनर्वसन प्रकल्पात स्थानिक रहिवासी, छोटे उद्योजक आणि कष्टकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कारस्थान सुरू असून अपात्रतेच्या नावाखाली हजारो गोर-गरिबांना मुंबईबाहेर हाकलण्याचा प्रयत्न सुरु असणे, कुर्ला, मुलुंड आणि मुंबईतील इतर मोक्याच्या शासकीय जमिनी प्रकल्पांच्या नावाखाली विकासकांच्या ताब्यात दिल्या जात असणे, रस्त्यांच्या विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा निधी

खर्च दाखवला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आणि निष्कृष्ट दर्जाची झालेली असणे, मुंबई-गोवा महामार्गाच्या संपूर्ण चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वास न गेल्याने कोकणातील पर्यटनावर झालेला परिणाम, मुंबई-गोवा महामार्गासह सागरी महामार्गाचे काम अपूर्ण असताना शासनाने मुंबई ते गोवा ग्रीनफिल्ड हायवेची घोषणा करूनही गेल्या ३ वर्षात त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, मोक्याचे आणि कोट्यवधी रुपये किमतीचे शासकीय भूखंड कवडीमोलाने मर्जीतील संस्था आणि उद्योगपतींना बहाल करण्यात येणे, गरिबांच्या घरांसाठी आणि सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनींची खुली लूट सुरु असणे, राज्यात विशेषत: बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या प्रकरणात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झालेला असणे, या घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वारंवार लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, मौजे चिंचपूर तालुका आष्टी, जिल्हा बीड येथील इनाम दर्गाह जमीन हस्तांतरण प्रकरण महसूल विभागाने जाणीवपूर्वक पुनर्निरीक्षणातून वगळले असणे, देवस्थान जमिनी घोटाळ्यांवर अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, मीरा भाईंदर तसेच येऊर जिल्हा ठाणे येथील आदिवासी जमिनींचा गैरव्यवहार, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, सरकारची परवानगी न घेता आदिवासींच्या जमीनी हडप करणे, भिवंडी येथील भूमी वर्ल्ड या विकासकाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून शॉपिंग मॉल उभारणे, तक्रार करून देखील अद्याप पर्यंत न झालेली कारवाई, महाराष्ट्रात वारंवार उघडकीस येत असलेले विविध प्रकारचे जमीन घोटाळे त्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही."

अशासकीय कामकाज

(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

सात : अशासकीय विधेयके :-

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) **श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०२६

(२) **श्री. रईस शेख, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र गिग आणि प्लॅटफॉर्म (ऑनलाईन) कामगार हक्क आणि संरक्षण विधेयक, २०२६

(३) **श्री. राजन नाईक, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

(४) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

(५) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (चौथी सुधारणा) विधेयक, २०२६

(६) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

(७) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

(८) **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२६

(९) **श्रीमती स्नेहा दुबे पंडित, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - महाराष्ट्र जमीन बळकावणे (प्रतिबंध) विधेयक, २०२६

(१०) **श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स. यांचे** विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र अधिवक्ता (हिंसाचारास प्रतिबंध आणि संरक्षण) विधेयक, २०२६

(ब) विचारार्थ :-

(शुक्रवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली तथापि, चर्चा न झालेली अशासकीय विधेयके क्रमांक १ ते ६)

(१) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

(२) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५

(३) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५

(४) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिराती फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५

(५) **श्री. अबू आजमी, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८३ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरु व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५

(६) **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

(मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजी बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके क्रमांक ७ ते १०)

(७) **श्री. सुधीर मुनगंटीवार**, **वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९१ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२५

(८) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

(९) **श्री. सुधीर मुनगंटीवार**, **वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०२५

(१०) **ॲड. राहुल कुल**, **वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८५ - महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक, २०२५

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : २ जुलै, २०२६.

जितेंद्र भोळे,
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

महाराष्ट्र विधानसभा

शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ रोजीच्या
दिवसाच्या कामकाजाच्या क्रमाचे शुध्दीपत्रक

विधानसभेच्या शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील **बाब क्रमांक "दोन (२) (झ)" पुढीलप्रमाणे वाचण्यात यावी.**

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री : (झ) हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३ जुलै, २०२६.

जितेंद्र भोळे
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा